शी/१३३

# डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**अत्यंत महत्वाचे**

क्र.बीजीए/पेन्शन/माहिती/०९/२०२१
दिनांक: ०४/१०/ २०२१ /१५६१

प्रती,

______________________

______________________

______________________

(सर्व कार्यालये )

विषय : **विद्यापीठातंर्गत काम करीत असणारे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वयाबाबतची माहिती.**

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या आस्थापनेवर काम करीत असणारे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वयाला दिनांक ०१-०१-२०२३ ते ३१-१२-२०२३ या कालावधीत त्यांचे वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण होत असतील किंवा या अगोदरच पूर्ण केली असतील असे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे वयाबाबतची माहिती पत्रासोबत जोडलेल्या 'अ' व 'ब' विवरण पत्रामध्ये भरुन ती कोणत्याही परिस्थितीत या कार्यालयास दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत प्राप्त होईल या बेताने पाठवावी.

कर्मचा-याचे वयाचा हिशेब करतांना, त्याचे मुळ सेवा पुस्तकात नोंदविलेली जन्म तारीखच विचारात घ्यावी. जर काही कर्मचा-यांनी आपली जन्म तारीख विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक बीजीजी/१२७२, दिनांक १२-९-१९७२ नुसार बदलविल्याबाबत अर्ज केला असेल तर याबाबतची माहिती विवरण पत्राच्या रकाना क्रमांक ८ (आठ) मध्ये स्पष्ट नमूद करावी. परंतु रकाना क्रमांक ५ (पाच) मध्ये कर्मचा-यांची जन्मतारीख ही त्यांचे सेवापुस्तकात नोंदविलेल्या जन्म तारखेप्रमाणे (आधारेच) असावी व त्याच जन्म तारखेच्या आधारे वयाला ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण होण्याची अथवा अगोदरच पूर्ण झाल्याची तारीख काढून ती रकाना क्रमांक ७ (सात) मध्ये नमूद करावी. तसेच कर्मचा-याचे नांव लिहितांना संपुर्ण नाव लिहावे. (संक्षिप्त स्वरुपात नाव लिहू नये.)

..२/

तसेच ज्या कर्मचा-यांची नियुक्ती दिनांक ०१ नोहेंबर २००५ नंतर झालेली आहे आणि ज्या अधिकारी/कर्मचा-यांना 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' लागु करण्यात आलेली आहे अशा अधिकारी/कर्मचा-यांची माहिती विवरण पत्र 'ब' मध्ये देण्यात यावी.

आपले कार्यालयाचे आस्थापनेवर काम करीत असलेले कर्मचारी व अधिकारी यापैकी कोणीही दिनांक ०१-०१-२०२३ ते ३१-१२-२०२३ या कालावधीत वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण करीत असतील असे अधिकारी व कर्मचारी या माहितीतून वगळल्या गेल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

तसेच विवरण पत्रात आवश्यक ती माहिती दिल्यानंतर माहिती खाली आहरण व संवितरण अधिका-यांनी खालील प्रमाणे प्रमाणपत्र द्यावे.

" वर दिलेल्या माहिती व्यतिरिक्त या कार्यालयाच्या आस्थापनेवर काम करीत असलेले अधिकारी व कर्मचारी यापैकी कोणीही दिनांक ०१-०१-२०२३ ते ३१-१२-२०२३ या कालावधीत आपल्या वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण करीत नाहीत अथवा या अगोदरच पूर्ण झाली नाहीत."

उपरोक्त माहिती कोणत्याही परिस्थितीत दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी.

(टिप: विद्यापीठ सेवेत कार्यरत असतांना एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास तशी सूचना या कार्यालयास देण्यात यावी.)

सहपत्र : विवरणपत्र 'अ' व 'ब'

उपकुलसचिव(आस्था)
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.

55 Yrs.doc

## विवरण पत्र 'अ'

विद्यापीठ सेवेत असणा-या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यास वयाला दिनांक ०१/०१/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीत वयाची ५५ (पंचावन्न) वर्षे पूर्ण होत असतील किंवा अगोदच पूर्ण झाली असतील अशा कर्मचा-यांची माहिती.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे संपूर्ण नांव जसे -नांव, वडीलांचे आडनांव | हुद्दा व विषय (पदनाम पुर्ण लिहण्यात यावे) | वेतनश्रेणी | सेवा पुस्तकानुसार जन्म तारीख व ती कोणत्या आधारावर नोंदली आहे. | शासन सेवेत परत जाण्याचा विकल्प दिला आहे काय ? | सर्व बाबतीत कर्मचा-यांचे वयाला ५५ (पंचावन्न) वर्षे पूर्ण होण्याची अथवा झाल्याची तारीख | विद्यापीठ परिपत्रक क्र. बीजीजी/१२७२, दिनांक १२/९/१९७२ नुसार जन्म तारीख बदल करण्याचा अर्ज केला असल्यास कोणत्या पत्रानुसार या कार्यालयास सादर केला आहे. | कर्मचा-याचे आस्थापना कार्यालयाचे नांव | कर्मचारी प्रत्यक्षात काम करीत असलेल्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

वर दिलेल्या माहिती व्यतिरिक्त या कार्यालयाच्या आस्थापनेवर काम करीत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यापैकी कोणीही दिनांक ०१-०१-२०२३ ते ३१-१२-२०२३ या कालावधीत आपल्या वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण करीत नाहीत अथवा या अगोदरच पूर्ण झाली नाहीत.''

आहरण व संवितरण अधिका-याची सही
व कार्यालयाचा शिक्का दिनांकासह

# विवरण पत्र 'ब'

दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यास वयाला दिनांक ०१/०१/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीत वयाची ५५ (पंचावन्न) वर्षे पुर्ण होत असतील किंवा अगोदच पूर्ण झाली असतील अशा कर्मचा-यांची माहिती.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे संपूर्ण नांव जसे -नांव, वडीलांचे नांव आडनांव | हुद्दा व विषय (पदनाम पुर्ण लिहण्यात यावे) | वेतनश्रेणी | सेवा पुस्तकानुसार जन्म तारीख व ती कोणत्या आधारावर नोंदली आहे. | शासन सेवेत परत जाण्याचा विकल्प दिला आहे काय ? | सर्व कर्मचा-यांचे बाबतीत वयाला ५५ (पंचावन्न) वर्षे पूर्ण होण्याची अथवा झाल्याची तारीख | विद्यापीठ परिपत्रक क्र. बीजीजी/१२७२, दिनांक १२/९/१९७२ नुसार जन्म तारीख बदल करण्याचा अर्ज केला असल्यास कोणत्या पत्रानुसार या कार्यालयास सादर केला आहे. | कर्मचा-याचे आस्थापणा कार्यालयाचे नांव | कर्मचारी प्रत्यक्षात काम करीत असलेल्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

वर दिलेल्या माहिती व्यतिरिक्त या कार्यालयाच्या आस्थापनेवर काम करीत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यापैकी कोणीही दिनांक ०१-०१-२०२३ ते ३१-१२-२०२३ या कालावधीत आपल्या वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण करीत नाहीत अथवा या अगोदरच पूर्ण झाली नाहीत."

आहरण व संवितरण अधिका-याची सही
व कार्यालयाचा शिक्का दिनांकासह

55 Yrs.doc